**साक्षीदार क्र. ०१ चा उलटतपास आरोपी तर्फे श्रीमती ए.आर.शेख विधीज्ञ यांच्यामार्फत सुरूः**

मी जम्मू शाळा येथे शिक्षीका म्हणून काम करते. मी २०१८ पासून तेथे नियुक्तिस आहे. फिर्यादी हे नात्याने माझे पती आहेत. जम्मू शाळेच्या बसवरती माझे पती चालक म्हणून काम करतात. माझ्या शाळेची वेळ १२.४० पासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत असते. संस्था चालक अंजुम खादरी ही नात्याने माझी बहीण होय. अंजूम ही पूर्वी सरकारी दवाखान्यामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करत होती. हे म्हणणे खरे नाही की, शाळेमध्ये परिक्षा असल्याने दि.०६/११/२०२३ ला शाळेची वेळ सकाळी ०९.०० ते ११.०० पर्यंत होती. अब्दुल वारीस राजा पटेल यांची मुलगी आमच्या शाळेत इयत्त ७वी मध्ये शिकत होती. मुनवर हा आमच्या शाळेतील चपरासी होय. मुनवर याच्यावर मुलीची छेडछाड व लैंगिक शोषण केल्याबाबत आरोप होते व तशी फिर्याद तशी पोलिसांत नोंदवली गेलेली होती. मुन्वर याने दुसऱ्या एका मुलीची छेड काढली म्हणून मुलीच्या आईने मुख्याध्यापकाकडे तक्रार केल्याचे माझ्या माहितीत नाही. मुन्वर याने छेडखानी केल्यावर त्या मुलींच्या पलकांना लेखी माफीनामा लिहून दिला होता की काय हे मला माहिती नाही. माझ्या पतीचे नाव आरोपी क्र.२ म्हणून मुन्वरच्या केसमध्ये नमूद आहे. ती केस आज उदगीर येथे सत्र न्यायालयापुढे प्रलंबित आहे.

मुलींच्या छेडकानी विषयी शाळेत बैठक झाली त्यावेळी माझे पती तेथे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर कर्मचारी भांडण सोडवण्यासाठी गेलो होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने बांबुच्या काठीने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. मला आता माझा पोलिसांपुढील जबाब दाखवला, त्यामध्ये बांबुच्या काठीने असा उल्लेख करण्यात आलेला नाही. माझ्या

पतीवर २५/२०२३, दि.२४/०१/२०२३ रोजी मिर्झा शमीम बेगम अन्वर बेग यांच्या पती सोबत भांडण केले म्हणून दाखल झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/११/२०२३ ला मी जम्मू शाळेमध्ये दुपारी ०१.०० उपस्थीत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी भांडणाचा आवाज ऐकला म्हणून भांडण सोडवायला गेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुन्वर व वारीस यांच्या दरम्यान भांडण चालू होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व कर्मचारी यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला हे मी खोटे सांगत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पती विरुद्ध कोर्टमध्ये कार्यवाही होऊ नये म्हणून मी आरोपी विरुद्ध खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.31 13:48:56 +0530

**दिनांक – ३१/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**

**दाखला**

साक्षीदार यांची साक्ष हिंदी भाषेत घेण्यात आली. तिचा अनुवाद करुन मराठीत नोंदवून घेण्यात आली. साक्षीदार यांचा जबाब हिंदी सांगितला व तो मराठीत नोंदवून घेतला व तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे असल्याचे हिंदीत अनुवादीत करुन सांगण्यात आले. म्हणून सदर दाखला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.31 13:48:45 +0530

**दिनांक – ३१/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**